**BDC LIBRARY**

New Paper Clipping

**A.Y. 2024-2025**

# बा. दे. महाविद्यालयात शनिवारी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**पाटण,** दि. १२ : पाटण तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. पाटण व श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था मर्या., पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने पाटण तालुक्यातील नागरी, ग्रामीण, सेवक सहकारी पतसंस्था व बँकांमधील कार्यरत चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक सेवकांसाठी येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयातील डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम सभागृहात शनिवार, दि. १४ रोजी सकाळी १० ते ४ या वेळेत प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

अध्यक्षस्थानी कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटणचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर व प्रमुख पाहुणे म्हणून दि कराड अर्बन को ऑप बँक लि. कराडचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीपराव गुरव यांची उपस्थिती असणार आहे. सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत दापोली अर्बन को ऑप बँक लि. दापोलीचे चेअरमन डॉ. जयवंतराव जालगावकर हे नागरी सहकारी बँका व पतसंस्था कर्जवाटप व वसुली या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. दुपारी १.३० ते ३ या वेळेत दापोली अर्बन को. ऑप. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजीराव थोरात हे मनुष्यबळ विकास व नफा क्षमता यावर मार्गदर्शन करणार आहेत.

दुपारी ३ ते ४ या वेळेत प्रशिक्षणाचा समारोप करण्यात येणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन सचिव पाटण तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. पाटण व चेअरमन श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था मर्या., पाटण यांच्यावतीने करण्यात आले आहे.